## प्रेसनोट दि. २४/०१/२०१८

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांनी छापा कारवाईद्वारे मुंबई व दिल्ली येथील ४ युवतींची हायप्रोफाईल वेश्याव्यवसायातुन सुटका

दि. २३/१/२०१८ रोजी पोलीस नाईक सतिश ढोले सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे यांना मिळालेल्या माहीती नुसार इसमनामे राहुल हा त्याचे साथीदारासह सिल्व्हर रंगाचे महिंद्रा के.यु.व्ही. -१०० कार नंबर MH-14 -FG - ६५०७ मधुन वेश्या व्यवसाय करण्यासाठी मुलींना प्राप्त करुन त्यांना घेवुन लुल्ला नगर चौक ते गंगाधाम बिबवेवाडी रोडवरील भारत पेट्रोल पंपासमोर त्याचे ओळखीचे गि-हाईकांना मुलींचे बरोबर व्यवहार ठरविण्यासाठी येणार आहे अशी माहिती मिळाले वरुन, गुन्हे शाखेच्या पथक व कोंढवा पोलीस स्टेशन मार्फत सयुंक्तीक कारवाई करुन १. राहुल ऊर्फ अतिष चंद्रकिशोर शर्मा वय ३५ वर्षे धंदा वेश्या व्यवसाय रा. लँडमार्क सोसायटी, डी-८०१, उंड्री तालुका हवेली जि. पुणे २. विशाल ऊर्फ तेजबहादुर धनबहादुर छेत्री वय २८ वर्षे रा.लँडमार्क सोसायटी, डी -८०१, उंड्री तालुका हवेली जि. पुणे मुळगाव - मु पो नलबारी, संतोषनगर, थाना व जिल्हा उदलगुडी आसाम यांना व त्यांचे सोबत वेश्या व्यवसाय करीता मुंबई येथुन आणलेल्या एकुण ३ महिला त्याचे कार मध्ये मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन व मुलींची सुटका करुन चौकशी करता सदर मुलींना राहुल व त्याचे साथीदार यांनी वेश्या व्यवसायाकरीता पुणे येथे बोलावुन घेतले असल्याचे निष्पन्न झाले.

नमुद मुलींचेकडे चौकशी करता राहुल याने दिल्ली येथील एका मुलीस नानापेठ भागातील एका लॉजमध्ये ठेवले असल्याचे सांगितलेने तिची सुध्दा सदर ठिकाणावरुन सुटका करण्यात आली.

आरोपीत १. राहुल ऊर्फ अतिष चंद्रकिशोर शर्मा वय ३५ वर्षे धंदा वेश्या व्यवसायं रा. लँडमार्क सोसायटी, डी-८०१, उंड्री तालुका हवेली जि. पुणे २. विशाल ऊर्फ तेजबहादुर धनबहादुर छेत्री वय २८ वर्षे रा.लँडमार्क सोसायटी, डी -८०१, उंड्री तालुका हवेली जि. पुणे मुळगाव - मु पो नलबारी, संतोषनगर, थाना व जिल्हा उदलगुडी आसाम यांचेविरुध्द कोंढवा पो.स्टे. ४४/२०१८ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम. १९५६ कलम ४,५ सह भा.दं.वि.क. ३७०, ३७० अ, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील पिडीत मुलीला रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.श्री.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, मसपोनि शीतल भालेकर, सतिश ढोले, राजाराम घोगरे, नामदेव शेलार,नितिन तेलंगे, कविता नलावडे, राजेद्र कचरे, रेवनसिध्द नरुटे, संदिप गि-हे, सरस्वती कागणे, सुप्रिया शेवाळे यांनी व कोंढवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलींद गायकवाड व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.

## प्रेसनोट दि. २४/०१/२०१८

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांनी मोका कायद्यातील फरार आरोपीस अटक करुन पंचतारांकित हॉटेल वर छापा कारवाईद्वारे १ परदेशी महिलेची हायप्रोफाईल वेश्याव्यवसायातुन सुटका

दि. २३/१/२०१८ रोजी पोलीस नाईक नितीन तेलंगे सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे यांना मिळालेल्या माहीती नुसार येरवडा पो.स्टे. गु.र.नं.७५७/२०१७ भादवि कलम ३७०,३७०(अ) सह इटपा कायदा कलम ३,४,५ या गुन्ह्यास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(२), (३)(४) या गुन्हयातील पाहीजे (फरारी) आरोपी युवराज हा सोमनाथ नगर, वडगाव शेरी पुणे येथे त्याचे साथीदारासह लपुन बसला असल्याची माहीती मिळाले वरुन, गुन्हे शाखेच्या पथकाकडुन पडताळणीद्वारे छापा कारवाई करण्यात आली.

छाप्या दरम्यान मिळून आलेला युवराज केशव थापा व महिला नामे यिमना ऊर्फ ऊर्फ निशा जमेर रा. नागालँड यांच्याकडे अधिक चौकशी करता, युवराज थापा हा मोका कायद्यातील फरारी आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. तसेच युवराज व यिमना ऊर्फ निशा हे दोघे पुणे शहरात वेगवेगळ्या ठिकाणच्या मुली वेश्याव्यवसायासाठी मिळवुन वेगवेगळ्या हॉटेल मध्ये त्यांचे नावे रुम बुक करुन त्यांना तेथे ठेवुन, वेश्यागमनासाठीच्या ग्राहकांबरोबर मोबाईल फोनच्या माध्यमातुन संपर्क साधुन, वेश्यागमनासाठीची रक्कम ठरवुन ग्राहकांना हॉटेल रुम्समध्ये पाठवुन मुलींकडुन वेश्याव्यवसाय करवुन घेत असले बाबत माहीती मिळाली व सध्या त्यांनी नगररोड भागातील पंचताराकित हॉटेल मध्ये उझबेगीस्तान या देशाचे महिलेस ठेवुन तिचेकडुन वेश्याव्यवसाय करवुन घेत असल्याची माहिती मिळाली. त्यावरवरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. संजय पाटील व सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी, कर्मचारी तसेच येरवडा पोलीस स्टेशनकडील पोलीस निरीक्षक श्री अशोक कदम यांनी यांनी संयुक्त कारवाई करून नगररोड परिसरातील पंचतारांकित हॉटेलमध्ये चालत असलेल्या हायप्रोफाईल वेश्याव्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान उजबेकीस्तान देशाचे एका महिलेची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन तिला वेश्या व्यवसायास लावणारे १) युवराज केशव थापा वय २७ वर्षे मुळगाव बुटोल बिशकॅम जिल्हा रुपनदेही नेपाळ सध्या रा. वाघमारे बिल्डींग स.नं. ४३ बिकानेर स्वीटमार्ट मागे, सोमनाथ नगर, वडगाव शेरी पुणे व महिला आरोपीनामे २) यिमना उर्फ निशा मिलंबा जमेर वय २३ वर्षे रा. सदर मुळगाव अवईसिटी कॉलनी , दिमापुर, नागालॅंड सध्या रा. सदर यांचेविरुध्द ‌येरवडा पो.स्टे. ५९/२०१८ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम. १९५६ कलम ३,४,५ सह भा.दं.वि.क. ३७०, ३७० अ,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील पिडीत मुलीला रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.श्री.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री.संजय पाटील, मसपोनि शीतल भालेकर, नितिन तेलंगे, राजाराम घोगरे, नामदेव शेलार, राजेश उंबरे, रमेश लोहकरे, सचिन कदम,सचिन शिंदे, अनुराधा ठेंबरे, रुपाली चांदगुडे, गितांजली जाधव यांनी केली आहे.